महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

DGP-D31/2/2025-DESK 31/Composite Bill Payment System दिनांक ई स्वाक्षरीत नमूद

**स्मरणपत्र- २**

संदर्भ :- या कार्यालयाचे समक्रमांकित दि.२३/०९/२०२५ चे पत्र व दि.१४/११/२०२५ चे स्मरणपत्र.

विषय :- सर्व शासकीय कार्यालयांच्या विदयुत देयकासंदर्भात Composite Billing प्रणाली राबविण्याबाबत..

******

उपरोक्त संदर्भाधिन विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महावितरण कंपनीने एकाच यंत्रणेतील विविध वीज ग्राहकांसाठी एकत्रित विद्युत देयक प्रणाली (Composite Bill Payment System) तयार केलेली आहे. या नवीन प्रणालीनुसार एकत्रित विद्युत देयके सादर करण्यासाठी पोलीस महासंचालक कार्यालयाअतंर्गत असलेल्या सर्व घटक कार्यालयातील विदयुत मीटरची माहिती शासनास सादर करावयाची असल्याने आपल्या व आपल्या अधीपत्याखालील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांचे अधीनस्त पोलीस कार्यालये, पोलीस वसाहतीमधील (पोर्च व इतर बाहेरील बाजूची विदयुत देयके), पोलीस स्टेशनमधील सर्व विदयुत मीटरची सवस्तिर माहिती उपरोक्त संदर्भाधिन दि.२३/०९/२०२५ च्या पत्रान्वये व दि.१४/११/२०२५ च्या स्मरणपत्रान्वये मागविण्यात आली होती. परंतु, अदयापही काही घटक कार्यालयातील विदयुत मीटरची माहिती या कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

तरी, पोलीस महासंचालक कार्यालयाअंतर्गत सर्व घटक प्रमुखांनी आपल्या व आपल्या अधीपत्याखालील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांचे अधीनस्त पोलीस कार्यालये, पोलीस वसाहतीमधील (पोर्च व इतर बाहेरील बाजूची विदयुत देयके), पोलीस स्टेशनमधील सर्व विदयुत मीटरची सवस्तिर माहिती **एकत्रित करुन दि.१९/१२/२०२५ पर्यंत नचुकता खालील नमुद तक्त्यात Excel Sheet मध्ये** project2.dgoffice@mahapolice.gov.in **या mail ID वर पाठविण्यात यावी.**

| अ.क्र. | घटक कार्यालयाचे नाव (Unicode) | आहरण व संवितरण अधिकारी यांचे नाव (Unicode) | मीटर क्रमांक (English-Times New Roman) | मीटर ज्या ठिकाणी आहे ते कार्यालय / पोलीस स्टेशन / पोलीस वसाहतीचे नाव (Unicode) |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |

Digitally signed by
Kalpana Kisan Lokhande
Date: 16-12-2025
14:16:50

(कल्पना लोखंडे)
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (लेखा),
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, म.राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे,

संचालक, नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके / वाहतूक / आर्थिक व गुन्हे शाखा / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण / राज्य राखीव पोलीस बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व पोलीस आयुक्त,
अपर पोलिस महासंचालक व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक,
अपर पोलिस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, म.राज्य, पुणे,
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटर परिवहन विभाग, पुणे / नक्षल विरोधी अभियान, नागपूर,
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक,
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर,
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सह),
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, नागपूर,
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र (रा.रा.पो.बल. नानवीज सह) / अपारंपारिक अभियान प्रशिक्षण (UOTC), केंद्र, नागपूर,
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१ ते १९
कार्यालय अधीक्षक, का.क्र.-१९ अ. (पोमसं कार्यालय)

<u>प्रत, माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरिता सादर,</u>

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
पोलीस आयुक्त, मुंबई शहर
पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
महासमादेशक, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

२. यांना विनंती करण्यात येते की, शासन पत्र दि.११/०८/२०२५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती शासनास परस्पर सादर करावी.

<u>प्रत:-</u>

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधीक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू परिपत्रकाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर फ्लॅश मध्ये "घरबांधणी / मोटार सायकल / संगणक प्रतिक्षा यादी आणि मंजूर यादी" या सदराखाली प्रसारित करण्यात यावी.

कार्यालय अधीक्षक, का.क्र.३६

<u>प्रत सस्नेह सादर,</u>

अपर मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
(लक्षवेध :- अरविंद शेटे, उप सचिव, अर्थ-१)